**प्रेसनोट दि.१४/०५/२०१९**

## बिबवेवाडी पोलीस ठाणे पुणे शहर

## हरवलेल्या मुलीस संस्थापीका यांचे दिले ताब्यात

दि.१२/०५/२०१९ रोजी पोलीस नाईक पाटोळे हे दिवसपाळीस बिबवेवाडी पोलीस ठाणेस ठाणे अंमलदार म्हणुन कर्तव्यास असताना दुपारी १३.०० वा चे सुमारास इसम नामे अब्दुल रज्जाक शेख धंदा-रिक्षा चालक,रा.१०६ शुक्रवार पेठ जामा मस्जिद जवळ भोरी आळी पुणे. हे बिबवेवाडी पोलीस ठाणेस येवुन त्यांनी एक ०७ वर्षाची हरवलेली मुलगी पोलीस नाईक पाटोळे यांच्या ताब्यात दिल्याने त्यांनी तिचे वर्णन घेवुन पुणे नियंत्रण कक्ष येथे सर्व पोलीस ठाणेस ब्रॉडकास्ट करणेस कळवुन पोलीस ठाणेचे स्टाफचे मदतीने त्यांनी मुलीस सोबत घेवुन पोलीस ठाणेचे हद्दीत तीच्या पालकाचा शोध घेतला परंतु तीला तीचा राहण्याचा पत्ता सांगता येत नसल्याने तीच्या पालकाचा शोध लागला नाही. त्याचवेळी पुणे नियंत्रण कक्ष येथुन समजले की, सदर वर्णनाची मुलगी ही समर्थ पोलीस ठाणेचे हद्दीतुन हरवली आहे असे कळविल्याने पो.ना.पाटोळे यांनी समर्थ पोलीस ठाणेस संपर्क करुन मिळालेल्या मुलीचा फोटो समर्थ पोलीस ठाणेचे कर्मचारी खाडे यांचे मोबाईलवर व्हॉट्सअॅपवर पाठवले असता सदर मुलगी तीच असल्याची खात्री झाल्याने त्यांचेकडे अधिक चौकशी करता सदरची मुलगी ही एकलव्य घरटे प्रकल्प, भेलागीरी शाळा,सोमवार पेठ येथे शिक्षणासाठी तीच्या आई-वडीलांनी तीला दाखल केले असल्याचे समजले त्यावेळी समर्थ पोलीस ठाणेचे पोलीस कर्मचारी खाडे, शेख व एकलव्य घरटे प्रकल्प, भेलागीरी शाळा सोमवार पेठ पुणे येथील संस्थापीका सौ. प्रतिभा संजय श्रीयन असे बिबवेवाडी पोलीस ठाणेस आल्याने त्यांचेकडे सदर मुलीबाबत अधिक चौकशी करुन त्याची खात्री झाल्याने सदर मुलीस सुखरुप त्यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगीरी पोलीस नाईक पाटोळे, मपोशि मोटे, पोलीस शिपाई डाके, ढोपे,केंद्रे व समर्थ पोलीस ठाणेचे पोलीस शिपाई खाडे, शेख यांनी केली आहे.

